| Punya Nagari (Marathi) | 25 May 2017 | Mumbai |
| --- | --- | --- |

# एनसीजीच्या अंतर्गत देशातील १०८ कर्करोग रुग्णालये

**मुंबई :** कर्करोगावरील उपचार करणारी रुग्णालये व संशोधन संस्था यांच्या देशभरातील असलेल्या जाळ्यामध्ये (नॅशनल कॅन्सर ग्रीड- एनसीजी) १०८ संस्था, रुग्णालये व उपचार केंद्रे आहेत. २०१२ मध्ये स्थापन झालेल्या एनसीजीने आता देशातील अशा ६० टक्के कर्करोग उपचार व संशोधन केंद्रांना आपल्या छत्राखाली आणले आहे. टाटा ट्रस्टने एका अधिकृत निवेदनामध्ये ही माहिती दिली. २० व २१ मे रोजी मुंबईतील टाटा मेमोरिअल रुग्णालयामध्ये एनसीजीची सातवी बैठक आयोजित करण्यात आली होती. त्या वेळी देशभरातील १०८ संस्थांमधून १५० जणांनी आपला सहभाग नोंदवला होता. देशभरातील या कर्करोग संबंधातील केंद्रांमध्ये समन्वय साधणे, तंत्राची देवाणघेवाण करणे ही कामे या सर्व ठिकाणी केली जातात. टाटा मेमोरिअल सेंटर या एनसीजीला प्रामुख्याने मार्गदर्शन करत असून पाठिंबाही देत आहे.